निवडणूक तात्काळ
ई-मेलव्दारे

> **माहे जून ते सप्टेंबर २०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.**

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.४/का-८
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : sec.mh@gov.in
दिनांक: २६ एप्रिल २०१७

प्रति,
**जिल्हाधिकारी (सर्व),**
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*
*(ग्रामपंचायत शाखा)*

**विषय :- माहे जून ते सप्टेंबर २०१७** या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या **सार्वत्रिक तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी** निवडणूक कार्यक्रम.

**संदर्भ :-** १) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१६/प्र.क्र.७/का-८, दि.०१/०६/२०१६ रोजी व त्या अनुषंगाने राबविण्यात आलेले प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम.
२) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.३/का-८, दि.०५/०४/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम.

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.५७५६/२००५, (श्री. किशनसिंग तोमर विरूध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर) या याचिकेमध्ये दि.१९/१०/२००६ रोजी पुढीलप्रमाणे महत्वपूर्ण निवाडा दिलेला आहे.

(ई) राज्य निवडणूक आयोग यांचे अधिकार, शक्ती व दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या समकक्ष आहेत.

(उ) राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

(ऊ) राज्य निवडणूक आयोगाने दिलेले निर्देश राज्य शासनावर बंधनकारक आहेत, इत्यादी.

१.२ कायद्याची वरील तरतूद लक्षात घेता निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या वेळी ज्याप्रमाणे कार्यवाही केली जाते त्याप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळी सर्व आवश्यक बाबींवर कार्यवाही करणे गरजेचे आहे.

**२. यासंदर्भात आपणास यापूर्वी पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत :-**

२.१ आयोगाच्या उक्त संदर्भाधिन क्रमांक १ च्या पत्रान्वये सन-२०११ च्या जनगणनेची आकडेवारी विचारात घेऊन प्रभाग रचना व आरक्षण इत्यादी कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

२.२ तसेच आयोगाच्या दिनांक ०५/०४/२०१७ च्या संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या संबंधित ठिकाणी दिनांक २४/०४/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

२.३ **मतदार यादीतील मयत अथवा स्थानांतरीत मतदारांबाबत तसेच दुबार नावांबाबत करावयाची कार्यवाही :-**

यासंदर्भात आयोगाच्या क्रमांक: रानिआ /मनपा- २०१० /प्र.क्र.४/ का-५, दि.११/१०/२०१० व दि.०७/०२/२०१२ च्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**३. निवडणूक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत महत्त्वाचे निर्देश:**

३.१ जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाप्रमाणे माहे जून ते सप्टेंबर २०१७ या कालावधीमध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती व नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व रिक्त पदांच्या पोट निवडणुकीचा कार्यक्रम (अनुक्रमे **परिशिष्ट-अ, ब आणि क** मध्ये दर्शविल्याप्रमाणे) जाहीर करण्यात येत आहे.

३.२ सदर निवडणूक कार्यक्रमास गाव, तालुका व जिल्हा पातळीवर स्थानिक प्रसिध्दी माध्यमांमार्फत (स्थानिक वृत्तपत्रे, केबल टि.व्ही. इ.) व्यापक प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी.

३.३ निवडणुकीबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी आयोगाच्या संकेतस्थळावर सूचना पुस्तिका (R. O. Handbook) प्रसिध्द करण्यात आली असून त्यातील निर्देशांनुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

३.४ प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने माहे जून ते सप्टेंबर २०१७ या कालावधीसाठी सार्वत्रिक व पोट निवडणुका एकत्रितपणे आधी म्हणजे मे-२०१७ मध्ये घेण्यात येणार असल्या तरी, आयोगाच्या दिनांक १२/११/१९९७ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे संबंधित कालावधीतील ग्रामपंचायतींचे गठन हे त्यांच्या मुदत समाप्तीच्या विहित दिनांकापूर्वी करण्यात येऊ नये, याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३.५ सोबतच्या निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे **फक्त गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकांकरीता मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० अशी राहील व इतर सर्व जिल्ह्यांत मतदानाची वेळ सकाळी ७.३० ते सायंकाळी ६.३० अशी असेल.**

३.६ **शासनाच्या क्र.व्हिपीएस-११६४/२८६१३/ई, दि. ०६ फेब्रुवारी, १९६५ च्या शासन निर्णयानुसार शनिवार दिनांक २७/०५/२०१७ हा मतदानाचा दिवस असल्याने या दिवशी सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम लागू असलेल्या क्षेत्रात, जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावर मतदानाकरीता स्थानिक सुट्टी जाहीर करावी.**

४. **निवडणूक विषयक कामकाजासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती.**

४.१ आयोगाच्या क्रमांक-रानिआ/मनपा २०१५/प्र.क्र.६/का.०५, दि.१०/०२/२०१५ च्या आदेशानुसार ग्रामपंचायतींच्या निवडणूका घेण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांची आहे. **तसेच यासंदर्भातील संपूर्ण देखरेखीची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त यांची आहे.**

४.२ आयोगाच्या क्रमांक-एसईसी१०९५/३०६/डेस्क३, दि.०२ मार्च, १९९५ च्या आदेशानुसार जिल्हाधिकारी हे निवडणुकीच्या कामाकरिता कर्मचारी अधिग्रहीत करण्यास सक्षम प्राधिकारी आहेत.

४.३ **निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर राहतील.**

४.४ कोणत्याही प्रकारे निवडणूक प्रक्रियेशी संबंधित चुका किंवा व्यत्यय होणार नाही व निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे नि:पक्षपातीपणे व रितसर पार पाडली जाईल याची दक्षता घ्यावी. याबाबत कोणत्याही प्रकारची चूक झाल्यास अथवा जाणीवपूर्वक नियमबाह्य कृती केल्याचे आढळल्यास संबंधितांविरुध्द आयोगाचे परिपत्रक दिनांक ०२/०८/२००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास अथवा आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास राहतील.

५. **निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण.**

जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना निवडणूक कामकाजाची माहिती होण्याकरीता **किमान २ वेळा** प्रशिक्षण आयोजित करावेत. त्यामध्ये प्रामुख्याने खालील विषयांचा समावेश करण्यात यावा :-

(iii) ई.व्ही.एम. च्या वापराबाबत.

(iv) आचारसंहितेसंबंधी आयोगाच्या दि.१४/१०/२०१६ च्या एकत्रित आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण.

६. **आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी:-**

६.१ **सार्वत्रिक व पोट निवडणूक असलेल्या सर्व संबंधित जिल्ह्यांतील ग्रामपंचायतीच्या संपूर्ण क्षेत्रात आज रोजी रात्री १२.०० वाजल्यापासून आचार संहिता लागू होईल. ही आचारसंहिता त्या-त्या ठिकाणच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील.**

६.२ आचारसंहिता कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात येऊ नयेत.

६.३ **निवडणूक आचारसंहितेबाबत आयोगाने दि.१४/१०/२०१६ रोजी निर्गमित केलेल्या एकत्रित आदेशानुसार, जिल्हाधिकारी स्तरावर निर्णय घेऊन आचारसंहिता भंगाबाबत तक्रारीची प्रकरणे तातडीने निकाली काढणे अपेक्षित आहे. फक्त अपवादात्मक प्रकरणात आयोगाकडे आचारसंहिता भंगाबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या उचित अभिप्रायासह अशी प्रकरणे सादर करण्यात यावीत.**

७. **या कार्यक्रमांतर्गत फक्त सार्वत्रिक निवडणुकीकरिता नामनिर्देशनासह पूर्ण निवडणूक प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने (Online) राबविण्यात यावी. यासंबंधात तहसिल कार्यालयात संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली मदत कक्ष (Help Desk) स्थापन करण्यात यावा.**

७.१ दि.१५/०५/२०१७ रोजी होणाऱ्या नामनिर्देशनपत्रांच्या छाननीच्या वेळी व ठिकाणी संबंधित ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक यांनी समक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे. याबाबत आवश्यक ते लेखी निर्देश संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) यांनी दि.०२/०५/२०१७ पर्यंत निर्गमित करावेत व त्याची प्रत जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना ई-मेलद्वारे अग्रेषित करावी.

७.२ तसेच आदेश क्रमांक - एसईसी/जीईएन-२००२/प्र.क्र.८५/का-०५ दिनांक १५ मार्च, २००४ व दिनांक ०७ जुलै, २००८ अन्वये, उमेदवाराने जंगम मालमत्ता, दोषसिध्दीनंतर झालेली शिक्षा व शिक्षण इ. बाबत घोषणापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व **निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना हे घोषणापत्र घेण्याबाबत योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.**

७.३ **जात वैधता प्रमाणपत्राबाबत घोषणापत्र.**

दिनांक ३१ मार्च २०१६ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ मध्ये सन-२०१६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र.१० या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आलेल्या ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या १०-१अ मधील दुरूस्तीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून नामनिर्देशन पत्राबरोबर जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेल्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत घेण्याची अट शिथिल करण्यात आलेली असून त्याऐवजी सदर अर्जदारांकडून विहित नमुन्यातील हमीपत्र घेवून असे नामनिर्देशनपत्र स्विकारण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात यावेत.

८. **निवडणुकीमध्ये उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा तसेच खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत.**

आयोगाने क्रमांक:रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१७/का.०५, दि:३० जुलै, २०११ अन्वये उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. याबाबत विहित मुदतीत व विहित रितीने खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह घोषित करण्याची तरतूद करण्यात आली असून सदरचे अधिकार आयोगाच्या दि.१९/११/२०१० च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच, आयोगाच्या क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का-६, दि.१० ऑगस्ट, २०१५ च्या आदेशानुसार सर्व उमेदवारांनी (बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारानेसुध्दा) दैनंदिन खर्चाचा हिशोब तसेच निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत एकत्रित खर्चाचा तपशिल जिल्हाधिकारी प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याकडे (तहसिलदार दर्जापेक्षा कमी नसलेल्या) सादर करणे आवश्यक आहे.

९. **नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या घोषणापत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास.**

आयोगाच्या क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का.०६, दि.२७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-५७६/३/२०१३-एसडीआर, दि.३० सप्टेंबर, २०१३ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ही बाब संबंधित उमेदवाराच्या तात्काळ **केवळ निदर्शनास** आणून द्यावी.

१०. **नामनिर्देशनपत्र, घोषणापत्र, इतर कागदपत्रे सादर करण्याच्या प्रक्रियेच्या संगणकीकरणाबाबत.**

१०.१ उमेदवारांना त्यांचे नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळी खालील कागदपत्रे सादर करावी लागतात :-

(अ) नामनिर्देशनपत्र

(ब) मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतचे घोषणापत्र

(क) आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती, व

(ड) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र- (जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केल्याची पावती व हमीपत्र)

१०.२ राज्य निवडणूक आयोगाने पहिल्या दोन बाबींकरिता म्हणजेच उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारे नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र भरणे आवश्यक आहे. http://panchayatelection.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन त्यामध्ये स्वतःची नोंदणी करून (Register) घ्यावी व नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच घोषणापत्रामध्ये माहिती भरावी. (सदरची माहिती सेव्ह करून ठेवता येऊ शकते. आवश्यक असल्यास दुरुस्ती करून) त्याचे प्रिंटआऊट काढून त्यावर स्वाक्षरी करून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. अशाप्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशनपत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

१०.३ सर्व उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र इ. भरण्यात अडचण येऊ नये म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आवश्यकतेप्रमाणे एक किंवा त्यापेक्षा जास्त मदत कक्षांची (Help Desk) स्थापना करावी व हेल्प डेस्क सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे. तसेच सायबर कॅफे व सी.एफ.सी. (Community Facilitation Center) ची मदत घेण्यात यावी.

१०.४ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाचे घोषणापत्र संगणकाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या नमुन्यात त्याचे प्रिंट आऊट घेऊन स्वतःची स्वाक्षरी करून आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करून ते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचे आहे.

१०.५ मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ च्या नियम ७ (क) नुसार उमेदवारास त्याची उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्याकरिता अर्ज विहित पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज संगणकाद्वारे भरावयाचे नाहीत अथवा ई-मेलद्वारे देता येणार नाहीत.

१०.६ नामनिर्देशनपत्र आणि घोषणापत्राचा नमुना खालील वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला आहे:- http://panchayatelection.maharashtra.gov.in या आज्ञावलीच्या वापराबाबत काही अडचणी आल्यास आयोगाच्या संगणकीकरण शाखेतील नोडल अधिकारी यांच्याशी दूरध्वनी व ई-मेल वर संपर्क साधावा.

११. **नामनिर्देशनपत्र मागे घेणे तसेच बिनविरोध निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास विजयी घोषित करण्याबाबत.**

निवडणुकांच्यावेळी उमेदवारी अर्ज भरताना अनेक उमेदवार अर्ज भरतात परंतु नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्यावेळी एक उमेदवार सोडून अन्य उमेदवार अर्ज मागे घेतात. अशावेळी तो उमेदवार **इतर उमेदवारांवर दबाव आणून किंवा प्रलोभन देऊन उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो ही शक्यता नाकारता येत नाही.** त्यामुळे असे प्रसंग घडल्यास राज्य निवडणूक आयोगास त्याबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, तहसिलदार तसेच संबंधित निवडणूक निरीक्षक यांचे सविस्तर अहवाल **जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह** तात्काळ **ई-मेलद्वारे आयोगास** सादर करावा व **राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे.** (संदर्भ: आदेश क्रमांक-रानिआ/मनपा/२००४/प्र.क्र.३७/का-०५, दिनांक २३/१२/२००४) याबाबत आयोगाच्या आदेशाचे पालन करावे. तसेच नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम मुदतीची काटेकोरपणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

१२. **मतदान केंद्राबाबत**

आयोगाने मतदान केंद्र निश्चितीबाबत विहित केलेल्या निकषांनुसार मतदान केंद्र निश्चित करावे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीकरिता मतदाराचे नाव ज्या मतदान केंद्रावर होते त्याच मतदान केंद्रावर शक्यतोवर (मतदान केंद्राची इमारत) ग्रामपंचायतींच्या निवडणुकीमध्ये मतदाराचे नाव राहील.

i. प्रत्येक मतदान केंद्राला सुमारे ८०० मतदार जोडण्यात यावेत. या मतदान केंद्रावर सर्व सोयी सुविधा लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच असतील याची खबरदारी घ्यावी.

ii. संवेदनशील व अतिसंवेदनशी केंद्रांची यादी निश्चित करून त्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी.

iii. मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करून सदर मतदान केंद्रावर आवश्यक त्या सोयी-सुविधा उदा. सुव्यवस्थित खोल्या, सुरक्षा, रॅम्प, वीज पुरवठा, पिण्याचे पाणी, भिंत, शौचालय सुविधा असल्याबाबत खात्री करावी.

iv. आपल्या जिल्ह्यात आदर्श मतदान केंद्र तयार करण्याकामी नावीन्यपूर्ण कल्पना राबवाव्यात व शक्यतो सर्व मतदान केंद्रे त्या धर्तीवर तयार करण्यात यावीत.

v. निवडणुकीसाठी वापरण्यात येणारी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे तयार करावी व ती सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्रॉंग रुमची व्यवस्था करावी.

vi. कोणत्याही कारणास्तव मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी संबंधित ठिकाणी वीज पुरवठा खंडीत होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**१३. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मार्कर पेन यांच्या वापराबाबत.**

१३.१ या निवडणुका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर घेण्यात येतील. ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करुन मतदान करण्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबतचे आदेश क्रमांक-रानिआ/२००७/प्र.क्र.०३/का-०८, दि.२९/०३/२००७ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेले असून आयोगाचे दि.०४/०४/२००७ चे पत्रान्वये यापूर्वीच पाठविण्यात आले आहे. त्या आदेशानुसार कार्यवाही करावी. तसेच **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावर** None Of The Above (NOTA) **बटनाची सुविधा उपलब्ध करून दिल्याबाबत आयोगाचे क्र.रानिआ/२०१३/प्र.क्र.११/का-१२, दि.१२/११/२०१३ रोजीचे आदेश व दि. २६/११/२०१३ रोजीचे पुरक आदेशांचे यथोचित पालन करण्यात यावे.**

१३.२ मतदाराच्या बोटाला लावावयाच्या मार्कर पेनाच्या वापराबाबत या आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का-५, दि.१९/११/२०११ च्या पत्रातील निर्देशानुसार कार्यवाही करावी. तसेच ही मार्कर पेन वापरण्यायोग्य विहित मुदतीतील असल्याबाबत आपल्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी.

१४. निवडणूक विषयक अहवाल आयोगास सादर करण्याबाबत.

१४.१ जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिनियम, नियम व निवडणूक नियमांमधील तरतुदीनुसार निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून विहित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रसिध्द करावा. निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्थेसह आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस पार पाडावेत व यासंबंधातील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी. तसेच जिल्हा माहिती अधिकाऱ्यामार्फत सदर माहितीस प्रेस नोटद्वारे स्थानिक पातळीवर प्रसारमाध्यमाद्वारे प्रसिध्दी द्यावी. तसेच प्रत्येक टप्पा पार पाडल्यानंतर त्याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगास ई-मेलद्वारे सादर करावी.

निवडणुकीसंदर्भातील प्रशासकीय किंवा आयोगासंदर्भातील बातम्यांची कात्रणे दररोज सकाळी आयोगाच्या ई-मेल वर पाठवावीत हे काम जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडून करून घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असेल.

१४.२ राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०१/१२/२००४ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्राचा ताबा घेणे, मतदान यंत्रावर जबरदस्तीने मते नोंदविणे, गाळलेल्या मतदाराच्या याद्यातील लोकांना मतदान करू देणे यासारख्या सर्व गैरप्रकारांबाबत राज्य निवडणूक आयोगाला तात्काळ कळविण्याची दक्षता घ्यावी.

१४.३ याबाबत आयोगाकडून निवडणूक कार्यक्रमादरम्यान व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. उपरोक्त अहवाल उशीरा व चुकीचे झाले असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

१४.४ **अत्यंत महत्त्वाचे- मा. सर्वोच्च न्यायालयाने, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र.१०४७८/२०१४ संदर्भात दि.०९/१२/२०१६ रोजी दिलेल्या आदेशास अंतरिम स्थगिती दिली आहे; हे लक्षात घेता (आयोगाचे क्रमांक:रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.०१/का-५, दि.१०/०३/२०१७ च्या पत्राची प्रत संलग्न) सदर निवडणूक कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या पोट निवडणुकांमध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या दि.०९/१२/२०१६ रोजीच्या**

आदेशानुसार जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे जी पदे अनर्ह घोषित करण्यात आली आहेत, अशा रिक्त झालेल्या पदांकरिता आयोगाचे पुढील आदेश होईपर्यंत पोट निवडणुका लावण्यात येऊ नये.

१४.५ तसेच, निवडणूक कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भात न्यायालयाचे स्थगिती किंवा तत्सम आदेश प्राप्त झाल्यास त्याबाबत आपल्या स्तरावर लगेच कार्यवाही करुन त्याप्रमाणे आयोगास तात्काळ सूचित करावे. **याबाबतची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असेल.**

१४.६ आयोगाने दि.२१/०९/२०१५ रोजी सुधारीत आदेश निर्गमित केला आहे त्यानुसार, ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रक्रियेत मतदानापूर्वी संबंधित प्रभागातील ज्या प्रवर्गातील उमेदवाराचा मृत्यू झाला असेल, त्या प्रवर्गाचा फक्त त्या जागेच्या निवडणुकीबाबत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ मधील नियम १४-अ नुसार मतदान स्थगित करण्याबाबत प्रत्यादेश दिला पाहिजे व **त्या प्रवर्गाच्या फक्त त्या जागेच्या निवडणुकांसंबंधातील कामकाज उक्त नियम, १४-अ मध्ये नमूद केलेल्या परंतुकासह सर्व बाबतीत नव्याने सुरू करण्यात आले पाहिजे. वरील सुधारणेबाबत सर्व संबंधिताना सूचित करण्यात यावे.**

१५. निवडणूक निरीक्षकांची नेमणूक

आयोगाने क्रमांक:रानिआ/ग्रापनि-२०१५/प्र.क्र.३/का-८, दि.०४/१२/२०१५ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार या निवडणुकांमध्ये सर्व जिल्ह्यांत सार्वत्रिक निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतींची एकूण संख्या १०० पेक्षा कमी असल्याने संबंधित उप विभागीय अधिकारी यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नेमणूक संबंधित जिल्हाधिकारी यांनी परस्पर नेमणूक करावी व त्याबाबतचा अहवाल शनिवार दि.०६/०५/२०१७ पर्यंत आयोगास ई-मेलद्वारे सादर करावा.

१६. निवडून आलेल्या सदस्यांना त्याबाबतचे संगणकाद्वारे प्रमाणपत्र संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने द्यावे.

१७. ग्रामपंचायतींच्या निवडणुकींमध्ये मतदानाची टक्केवारी ही ७५ ते ८० टक्के असली तरी मतदानाची टक्केवारी यापेक्षा वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात यावी.

१८. **राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे :-**

| | |
|---|---|
| संकेतस्थळ | www.mahasec.maharashtra.gov.in |
| दूरध्वनी कमांक | ०२२-२२८४६७२० |
| ई मेल ॲड्रेस | gp.stateelectioncommission@gmail.com व sec.mh@gov.in |

सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या वर नमूद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपली,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत- परिशिष्टे - अ, ब आणि क

प्रत : १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, वित्त विभाग, सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

३. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
यांना कळविण्यात येते की, जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार त्यांना निवडणूक साहित्य वापरण्यास कृपया परवानगी देण्यात यावी.

४. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५. **प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**यांना कळविण्यात येत आहे की, सदर निवडणूक कार्यक्रमातील परिच्छेद क्र.४-अ व ४-ब संदर्भात आवश्यक ते निर्देश आपल्या स्तरावरून संबंधितांना त्वरीत निर्गमित करावे. तसेच ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करून त्यांना तात्काळ उपलब्ध करून द्यावे.**

६. विभागीय आयुक्त (सर्व) यांच्याकडे **परिच्छेद क्र.४.१ च्या संदर्भात** उचित कार्यवाहीसाठी.

७. **संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.**
यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री **पुरविण्यात यावी. तसेच मतपत्रिका व इतर छपाई विहीत वेळेत पूर्ण करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी.**

८. पोलीस महानिरीक्षक (सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य.

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व संबंधित)
**यांनी उक्त निर्देशपत्रातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.**

१०. जिल्हा पोलिस अधिक्षक (सर्व संबंधित)

११. सहायक आयुक्त, संगणकीकरण शाखा, रानिआ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, यांना उचित कार्यवाहीसाठी.

१३. राज्य निवडणूक आयोगाची सर्व कार्यासने

१४. निवड नस्ती (२ प्रती).

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.४/का-८, दि.२६/०४/२०१७ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

परिशिष्ट–अ

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेला माहे जून ते सप्टेंबर २०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक तसेच पोट निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम.

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२७/०४/२०१७ (गुरूवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.०५/०५/२०१७ (शुक्रवार) ते दि.१२/०५/२०१७ (शुक्रवार) वेळ स. ११.०० ते दु. ३.०० *(दि.०७ व दि.१० मे २०१७ हे सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून)* |
| ३ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१५/०५/२०१७ (सोमवार) वेळ स. ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ४ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दि.१७/०५/२०१७ (बुधवार) दु. ३.०० वाजेपर्यंत |
| ५ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दि.१७/०५/२०१७ (बुधवार) दु. ३.०० वा. नंतर |
| ६ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | **दि.२७/०५/२०१७ (शनिवार)** **स.७.३० वा. पासून ते सायं.६.३० वा. पर्यंत** *(गडचिरोली जिल्ह्यासाठी स.७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत)* |
| ७. | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील.) | **दि.२९/०५/२०१७ (सोमवार)** |
| ८ | निवडणुकांचा निकाल प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दि.३०/०५/२०१७ (मंगळवार) |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे,

( री. वि. फणसेकर )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०४/का-८, दि.२६/०४/२०१७ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट - ब

## मतदान दि. २७/०५/२०१७

## जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार माहे जून ते सप्टेंबर २०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित सार्वत्रिक निवडणूक असलेल्या ग्रामपंचायतींचा जिल्हानिहाय तपशिल.

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सार्वत्रिक निवडणुका असलेल्या ग्रा.पं. संख्या |
|---|---|---|---|
| १ | कोकण | ठाणे | ४ |
| २ | | पालघर | २६ |
| कोकण विभाग एकूण | | | ३० |
| ३ | नाशिक | नाशिक | ४ |
| ४ | | अहमदनगर | १ |
| नाशिक विभाग एकूण | | | ५ |
| ५ | पुणे | पुणे | २२ |
| ६ | | सातारा | १० |
| ७ | | सोलापूर | ४ |
| ८ | | सांगली | १ |
| पुणे विभाग एकूण | | | ३७ |
| ९ | औरंगाबाद | औरंगाबाद | १ |
| १० | | नांदेड | २ |
| ११ | | उस्मानाबाद | १ |
| १२ | | जालना | २ |
| औरंगाबाद विभाग एकूण | | | ६ |
| १२ | अमरावती | वाशिम | १ |
| अमरावती विभाग एकूण | | | १ |
| १४ | नागपूर | चंद्रपूर | १ |
| नागपूर विभाग एकूण | | | १ |
| **एकूण** | | | ८० |

(क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०४/का-८, दि.२६/०४/२०१७ च्या पत्रासोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-क

## जिल्ह्यांकडून प्राप्त माहितीनुसार रिक्त पदांच्या पोट निवडणुकांचा जिल्हानिहाय तपशील

| अ.क्र. | जिल्ह्यांचे नाव | ग्रामपंचायतींची संख्या | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ९९ | २१२ |
| २ | पालघर | ६६ | १३२ |
| ३ | रायगड | ६० | ७५ |
| ४ | रत्नागिरी | १८७ | २४७ |
| ५ | सिंधुदुर्ग | ३८ | ६५ |
| ६ | नाशिक | २१८ | ३४८ |
| ७ | जळगाव | ११० | १६२ |
| ८ | नंदुरबार | ४९ | ६३ |
| ९ | पुणे | ३५९ | ६०३ |
| १० | सातारा | ४८ | ८१ |
| ११ | सांगली | १०५ | १७० |
| १२ | कोल्हापूर | ७७ | १०० |
| १३ | औरंगाबाद | १०२ | १२० |
| १४ | नांदेड | १०९ | १६० |
| १५ | उस्मानाबाद | ४९ | ७४ |
| १६ | जालना | ७३ | ८६ |
| १७ | लातूर | ४५ | ५३ |
| १८ | अमरावती | ८९ | ११५ |
| १९ | यवतमाळ | ११६ | १५० |
| २० | बुलडाणा | ७२ | ८८ |
| २१ | नागपूर | ४६ | ८४ |
| २२ | वर्धा | ६३ | ८७ |
| २३ | चंद्रपूर | ४६ | ८० |
| २४ | भंडारा | ६० | १०३ |
| २५ | गडचिरोली | १५४ | ४५१ |
| एकूण | | **२४४०** | **३९०९** |

(टिप :- रिक्त पदांची संख्या, सदर निवडणूक कार्यक्रमातील परिच्छेद क्र. १४.४ मध्ये नमूद केलेल्या निर्देशाच्या अधीन राहून.)